## महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६

## (सुधारणा बाबतचे थोडक्यात विवरण)

| नियम क्र. | नियमाचे शीर्षक | नियमाचा आशय व समावेशाची पार्श्वभूमी |
|---|---|---|
| १ | **संक्षिप्त नाव आणि प्रारंभ** | या नियमाद्वारे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ अधिक्रमित होऊन महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ राजपत्रात प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील. |
| २ | **व्याख्या** | या नियमाद्वारे पूर्वीच्या नियमातील व्याख्या कायम ठेवून काही नवीन शब्दांच्या व्याख्या नव्याने समाविष्ट करण्यात आल्या आहेत. |
| ३ | **माहिती मिळविण्याची प्रक्रिया** | माहितीच्या विनंतीसाठी **पूर्वीची कार्यपद्धती कायम** ठेवून अर्ज शुल्क रु. १० वरून रु. ३० करण्यात आले (सविस्तर स्पटीकरण नोट क्र.६,परीच्छेद क्र.६-क-I ) |
| ४ | **माहिती पुरविण्यासाठी शुल्क** | या नियमाद्वारे माहितीच्या छायांकित प्रतीसाठी तसेच डिजिटल/स्कॅन प्रतींसाठी शुल्क रु. २ वरून रु. ५ करण्यात आले; डिजिटल माहितीसाठी स्वतंत्र तरतूद करून संदिग्धता दूर केली.(सविस्तर स्पटीकरण नोट क्र.६,परीच्छेद क्र.६-क- II ) |
| ५ | **शुल्क भरण्यातून सूट** | या नियमाद्वारे **पूर्वीची तरतूद कायम** ठेवण्यात आली आहे. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना शुल्कमाफी; पहिली ५० पाने मोफत व उर्वरित पानांसाठी विहित दराने शुल्क. |
| ६ | **शुल्क भरण्याची पद्धत** | या नियमाद्वारे पूर्वीच्या नियमातील शुल्क भरण्याच्या पद्धती कायम ठेवून त्या व्यतीरिक्त **यूपीआय व इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे** शुल्क भरण्याचा पर्याय नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. |
| ७ | **अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा** | सदर तरतुद पूर्वीच्या नियमातील असून ती कायम ठेवण्यात आली आहे. |
| ८ | **अभिलेख पाहणीसाठी प्रक्रिया** | सदर तरतुद पूर्वीच्या नियमातील असून ती कायम ठेवण्यात आली |

| नियम क्र. | नियमाचे शीर्षक | नियमाचा आशय व समावेशाची पार्श्वभूमी |
|---|---|---|
| | | आहे. |
| ९ | **ओळखपत्राची आवश्यकता** | प्रत्येक अर्जदाराने नागरीकत्व सिद्ध करणाऱ्या ओळखपत्राची प्रत जोडणे अनिवार्य; विभागीय आयुक्त समितीच्या शिफारशीनुसार नव्याने प्रस्तावित. (सविस्तर स्पटीकरण नोट क्र.६,परीच्छेद क्र.६-ब-IV ) |
| १० | **पुनरावृत्त अर्जांचे निकाल** | आधीच पुरविलेली माहिती पुन्हा मागितल्यास मागील पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद. राज्य माहिती आयुक्तांच्या तसेच विभागीय आयुक्त समितीच्या शिफारशीनुसार नव्याने समाविष्ट. |
| ११ | **स्वयंप्रेरणेने प्रकटीकरणाची जबाबदारी** | माहितीचे स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण न केल्यास कार्यालय प्रमुखावर जबाबदारी; स्वयंप्रेरणेने प्रकाशन न झाल्यामुळे अर्जांची संख्या वाढत असल्याने राज्य माहिती आयुक्तांच्या शिफारशीनुसार सदर तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे. |
| १२ | **संकेतस्थळावर उपलब्ध माहिती** | मागितलेली माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्यास सदर माहितीसाठी अनावश्यक अर्ज व साक्षांकनाचा भार टाळण्यासाठी सदर तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे. |
| १३ | **वैयक्तिक माहितीतून सूट** | वैयक्तिक माहिती प्रकटीकरणातून मुक्त; व्यापक सार्वजनिक हित असल्यास सक्षम प्राधिकारी लेखी कारणे नोंदवून ती उघड करू शकतात. सदर तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे. |
| १४ | **इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाची स्वीकार्यता** | ई-मेल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे केलेले संप्रेषण वैध मानले जाते. डिजिटल प्रशासनास चालना व इलेक्ट्रॉनिक उत्तरांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी नव्याने समाविष्ट. |
| १५ | **प्रथम अपीलीय** | अपील शुल्क रू.२० वरून रू.५०.<br>अपीलासोबत जोडावयाच्या कागदपत्राची यादी विहीत करण्यात |

| नियम क्र. | नियमाचे शीर्षक | नियमाचा आशय व समावेशाची पार्श्वभूमी |
|---|---|---|
| | **प्राधिकरणाकडे अपील** | आली असून  नमुन्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. |
| **१६** | **राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील** | अपील शुल्क रू.२० वरून रू.१००.<br>सदर तरतूद केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी तसेच राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे अपीलासोबत जोडावयाच्या कागदपत्राची यादी विहीत करण्यात आली असून नमुन्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. |
| **१७** | **अपील परत करणे** | त्रुटी असलेले अपील परत करण्याची तरतूद. केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी तसेच राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे. |
| **१८** | **आयोगाकडे अपीलाची प्रक्रिया** | अपील नोंदणी व सुनावणी प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे. |
| **१९** | **अपील किंवा तक्रारीची नोटीस** | डिजिटल माध्यमांचा समावेश करून नोटीस बजावणी प्रभावी करण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे.. |
| **२०** | **अपीलकर्त्याची वैयक्तिक उपस्थिती** | केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे... |
| **२१** | **अपील निकालात काढण्याची प्रक्रिया** | निकाल प्रक्रियेत स्पष्टता आणून अनावश्यक विलंब टाळण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे. |

| नियम क्र. | नियमाचे शीर्षक | नियमाचा आशय व समावेशाची पार्श्वभूमी |
|---|---|---|
| २२ | **पुराव्याचा भार** | तथ्य प्रतिपादन करणाऱ्या पक्षावर पुराव्याचा भार; राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे. |
| २३ | **अपील मागे घेणे किंवा रद्द होणे** | लेखी विनंतीवरून अपील मागे घेता येते; राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे.. |
| २४ | **राज्य माहिती आयोगाचा आदेश** | सर्व आदेश लेखी स्वरूपात आयोगाच्या शिक्क्याखाली जारी. केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे |
| २५ | **तक्रारीची प्रक्रिया** | कलम १८ अन्वये दाखल तक्रारींसाठी अपील प्रक्रियेचे नियम आवश्यक फेरबदलांसह लागू होतात. राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे. |
| २६ | **आयोगाचे प्रक्रियात्मक अधिकार** | आयोग न्यायाचे उद्दिष्ट साधण्यासाठी आनुषंगिक प्रक्रियात्मक आदेश पारित करू शकतो. राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे. |
| २७ | **सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे सादरीकरण** | सार्वजनिक प्राधिकरण आयोगासमोर बाजू मांडण्यासाठी कोणत्याही प्रतिनिधीस किंवा अधिकाऱ्यास प्राधिकृत करू शकते. केंद्र शासन नियमांशी सुसंगत बनविण्यासाठी **नव्याने सामाविष्ट.** |